# प्रेस नोट

अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव
दि.१५.०७.२०२१

**आलोसे शेख वसीम शेख फयाज, वय ३०, व्यवसाय— नोकरी, कनिष्ठ लिपीक, सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालय, रावेर जि.जळगाव यांनी २,५००/—रु ची लाच लाचेची मागणी केल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव यांची कारवाई**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | घटक | :— | जळगांव |
| २ | गुन्हा नोंद कंमाक | :— | रावेर पो.स्टे. गुरनं.२३०/२०२१ |
| ३ | कलम | :— | भ्रष्टाचार प्रतिबंधक (सुधारीत) अधिनियम सन २०१८ चे कलम—७ प्रमाणे... |
| ४ | आरोपीचे नांव व कार्यालय | :— | शेख वसीम शेख फयाज, वय ३०, व्यवसाय— नोकरी, कनिष्ठ लिपीक, सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालय, रावेर जि.जळगाव, रा.मदिना कॉलनी, रावेर,जि.जळगांव<br>( सार्वजनिक बांधकाम विभाग—वर्ग ३) |
| ५ | मागणी केलेली लाचेची तारीख व रक्कम | :— | दि.११/०७/२०२१ रोजी<br>२,५००/—रु. |
| ६ | गुन्हा दाखल तारीख | :— | दि.१५/०७/२०२१ |
| ७ | स्विकारलेली लाचेची रक्कम | :— | निरंक |
| ८ | थोडक्यात माहीती | :— | यातील तक्रारदार यांचे वडील हे सार्वजनिक बांधकाम उप विभाग,रावेर येथुन नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत.यातील आलोसे यांनी तक्रारदार यांचे वडीलांचे सेवानिवृत्तीचे ३,९१,७१०/—रु. ग्रॅज्युइटीचे बिल काढुन दिल्याच्या मोबदल्यात व अर्जित रजेचे बिल तयार करुन मंजुरीसाठी पाठविण्याच्या मोबदल्यात तक्रारदार यांचेकडेस ४,०००/—रु.लाचेची मागणी केली होती व दि.०७/०७/२०२१ रोजी आलोसे यांनी तक्रारदार यांचे दुकानात जावुन तक्रारदार यांचेकडुन २,०००/—रु.घेतले व उर्वरीत २,०००/—रु.नंतर देण्याचे ठरविले होते. त्याबाबत तक्रारदार यांनी दि.११/०७/२०२१ रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, जळगांव यांचेकडेस तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीची अँन्टी करप्शन ब्युरो, जळगांव पथकाने पंच साक्षीदारसमक्ष दि.११.०७.२०२१ रोजी पडताळणी केली असता आलोसे यांनी तक्रारदार यांचे वडीलांचे सेविनिवृत्तीचे बिल ३,९१,७१०/—रु. ग्रॅज्युइटी बिल काढुन दिल्याच्या मोबदल्यात उर्वरीत २,०००/—रु.तसेच अर्जीत रजेचे बिल तयार करुन मंजुरीसाठी पाठविण्याच्या मोबदल्यात ५००/—रु. असे एकुण २,५००/—रु.लाचेची मागणी केली म्हणुन गुन्हा. |

**लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आव्हान करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव कार्यालयात संपर्क करावा.**

संपर्क पत्ताः— लाप्रवि.जळगांव कार्यालय
संकेतस्थळः— **dyspacbjalgaon@gmail.com**
ऑन लाईन तक्रार/ॲप्लीकेशनः— **acbmaharastra.nct**
टोल फ्री कंमाकः— १०६४
दुरध्वनी कंमाकः— ०२५७—२२३५४७७
व्हॉट्सअॅप कंमाकः— ९५१८३१३८३२

(संजोग बच्छाव)
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

पोलीस उप अधिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो, जळगांव